नियम क्र. ७/२०१०

विद्यापीठाची सामाईक मुद्रा (University Common Seal) वापर करण्यासंदर्भात नियम, २०१०

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम १७(८) ची तरतुद खालील प्रमाणे आहे.

"The Registrar shall be the custodian of the records, the common seal and such other property of the University as the Management Council may, commit to his charge"

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम २८(g) ची तरतुद खालील प्रमाणे आहे.

"determine the form of a common seal for the university, and provide for its custody and use".

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेबाबतचा अध्यादेश क्र. १२/१९८६, विहित करण्यात आलेला आहे. मात्र त्यामध्ये सदर मुद्रा वापराबाबत कुठलीही तरतूद करण्यात आली नाही आणि त्यासंदर्भात यापूर्वी काही नियम, वगैरे तयार करण्यात आले नाहीत.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दि.११ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या सभेत बाब क्र. ३३५ अन्वये विद्यापीठाची सामाईक मुद्रा (University Common Seal) वापरासंदर्भात नियम तयार करण्याचे निर्देश दिले होते.

त्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेच्या निर्देशानुसार विद्यापीठाची सामाईक मुद्रेचा वापर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे नियम तयार करण्यात येत आहेत.

(१) हे नियम " विद्यापीठाची सामाईक मुद्रा (University Common Seal) वापर करण्यासंदर्भात नियम, २०१०", असे राहील.

(२) हे नियम व्यवस्थापन परिषदेने मंजुर केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

(३) या नियमावलीत त्यासंदर्भात असे विशेषत्वाने दाखविल्याशिवाय -

(अ) "विद्यापीठ" म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(ब) "संलग्नीत महाविद्यालये" म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम २, उपकलम (३) अंतर्गत ज्या महाविद्यालयांना विद्यापीठाद्वारे संलग्नीकरण प्रदान करण्यात आलेले आहेत अशी महाविद्यालये.

(क) "विद्यापीठ परिक्षेत्र" म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या अनुसुचिमध्ये अ.क्र.७ च्या समोर रकाना क्रमांक ३ मध्ये दर्शविण्यात आलेले १) अमरावती, २) अकोला, ३) बुलढाणा, ४) यवतमाळ आणि ५) वाशिम हे पांच जिल्हे.

(ड) "स्वायत्त महाविद्यालये", "स्वायत्त परिसंस्था" किंवा "स्वायत्त विभाग" म्हणजे परिनियमांअन्वये स्वायत्तता देण्यात आलेले आणि तसे संबोधण्यात आलेले महाविद्यालय, परिसंस्था किंवा विभाग, असा आहे.

(इ) दि.१३.५.१९८३ आणि दि.१८.११.१९८३ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेने बाब क्र.६९ अन्वये घेतलेल्या निर्णयानुषंगाने आणि दि.१४.८.१९८६ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेने अध्यादेश क्र.१२/१९८६ ला दिलेल्या मान्यतेसह व तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.४ मे, २००५ अन्वये अमरावती विद्यापीठाचे "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ" या प्रमाणे नामविस्ताराबाबत दि.२१.५.२००५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत बाब क्र.१७० अन्वये घेतलेली नोंद.

(४) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेचा वापर विद्यापीठाद्वारे आयोजित होणारे प्रशासकीय/शैक्षणिक स्वरूपाचे विविध कार्यक्रम जसे चर्चासत्र, कार्यशाळा इत्यादी करिता मुद्रित करण्यात येणाऱ्या निमंत्रण पत्रिका, विविध प्रकाशने, इत्यादी, तसेच, शासन परिपत्रकान्वये विद्यापीठाला आयोजित करावयाच्या प्रशासकीय/शैक्षणिक समारंभ/कार्यक्रमसंदर्भात सदर मुद्रेचा वापर करता येईल.

(५) महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम २४ अंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींच्या विद्यमान सदस्यांना त्यांना वाटल्यास सदर्हू मुद्रेचा (University Common Seal)

वापर त्यांना त्यांचे Letter Head अथवा Visiting Card वर करता येईल. तसेच विद्यापीठाचे अधिकारी यांना मा.कुलगुरूंच्या परवानगीने सदर्हू मुद्रेचा वापर करता येईल.

(६) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमार्फत आयोजित होणाऱ्या प्रशासकीय / शैक्षणिक कार्यक्रमासंदर्भात सदर मुद्रेचा वापर सदर महाविद्यालयाला करावयाचा झाल्यास त्याबाबत विद्यापीठाचे कुलसचिव यांच्या पूर्वपरवानगीने करता येईल.

(७) उपरोक्त अ.क्र. (४), (५) व (६) मध्ये नमुद केलेल्या व्यतिरिक्त वेळोवेळी आवश्यकता वाटल्यास व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वपरवानगीने विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेचा (University Common Seal) वापर करण्यासंदर्भात परवानगी देता येईल.

(८) विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेचा (University Common Seal) आदर योग्य प्रकारे होईल याबाबतची काळजी संबंधितांनी घेणे बंधनकारक असेल. विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेचा गैरवापर झाला असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास विद्यापीठाचे कुलसचिव हे या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करून सदर्हू कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर करतील.

*****